महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ 20 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 291 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



थोडक्यात महत्वाचे



## पडघा शेतकरी भात गिरणी सभापतीपदी दयानंद पाटील, उपसभापतीपदी ज्ञानेश्वर म्हात्रे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा दि. १८ (प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरातील गांवामधुन शेकडो शेतकरी सभासद असलेल्या व चांगले उत्पन्न असलेल्या शेतकरी सहकारी भातगिरणी मर्यादित या संस्थेच्या सभापतीपदी दयानंद पाटील यांची तर उपसभापती ज्ञानेश्वर म्हात्रे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

शेतकरी सहकारी भातगिरणी मर्यादित या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली आहे त्यातुन सभापती व उपसभापती निवडण्यासाठी निवडणूक अध्यासी अधीकारी एल. व्ही. भेरे यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा बुधवारी संस्थेच्या सभागृहात घेण्यात आली यावेळी सभापती पदासाठी दयानंद दुंदाराम पाटील व उपसभापती पदासाठी ज्ञानेश्वर शंकर म्हात्रे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची निवड झाल्याचे निवडणूक अध्यासी अधीकारी भेरे यांनी घोषित केले त्यांची निवड होताच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचीन पाटील भातगिरणी संस्थेचे संचालक प्रकाश भोईर, सुरेंद्र (विकास) पाटील, विष्णु पाटील,श्रीकांत गायकर, दत्तात्रेय पाटोळे, विलास पाटील, काशीनाथ शेलार,अजय पाटील,भगवान सांबरे, मनोहर ठाकरे,संतोष जाधव, कुसुम माघे, सुनंदा भोईर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## ६४ प्रवाशांचा बोगस तिकिटांद्वारे प्रवास

### कुशीनगर एक्स्प्रेसमध्ये दक्षता पथकाची धाड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने बुधवारी रात्री कुशीनगर एक्स्प्रेसवर छापा टाकून मोठ्या प्रमाणात बनावट आरक्षण तिकीटांचा पर्दाफाश केला. दक्षता पथकाच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, कुशीनगर एक्स्प्रेसच्या दोन एसी डब्यांमध्ये 16 डुप्लिकेट तिकिटे आढळून आली, ज्यामध्ये 64 प्रवासी प्रवास करत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, लोकमान्य टिळक टर्मिनसवरून गोरखपूरला निघालेल्या कुशीनगर एक्स्प्रेसवर दक्षता पथकाने छापा टाकला. एलटीटी ते इगतपुरी दरम्यान एसी कोच B1 आणि B8 मध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या ताब्यातून 16 डुप्लिकेट तिकिटे जप्त करण्यात आली आहेत. या तिकिटांवर 64 प्रवासी प्रवास करत होते. नियमानुसार दक्षता पथकाने संबंधित प्रवाशांकडून एक लाख 20 हजार रुपयांचा दंड वसूल केला. डुप्लिकेट तत्काळ तिकिटे राजस्थान, बिहार आणि उत्तर प्रदेशमधून जारी करण्यात आली होती. ही तिकिटे मुंबईतील भायखळा, कुर्ला आणि गोविंद येथे छापण्यात आली होती.

तपासादरम्यान यातील काही तिकिटे व्हीआयपी कोट्यातूनही कन्फर्म झाल्याचे समोर आले आहे. बनावट तिकिटांसह पकडण्यात आलेले बहुतांश प्रवासी गोरखपूर आणि बस्ती येथे जात होते. याबाबत दक्षता पथकातील अधिकाऱ्याने सांगितले की, उन्हाळ्याच्या सुटीत विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. प्रवाशांना त्यांच्या मूळ गावी सहज पोहोचता यावे यासाठी रेल्वे प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. प्रवाशांनी तिकीट दलालांना बळी पडू नये. सध्या तिकिटांसाठी मोठ्या प्रमाणात पैसे आकारूनही दलाल प्रवाशांना बनावट तिकिटे देत आहेत.

# ठाकरे बंधू एकत्र येण्याचे संकेत

## मात्र उद्धव ठाकरेंच्या अटी...

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज (दि.19) ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना एकत्र येण्यासाठी साद घातली होती. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी ही ऑफर स्वीकारण्यास होकार दिलाय. मात्र, उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरेंसमोर एक अट ठेवली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मी तयार आहे,मी सर्व मराठी माणसांना महाराष्ट्रसाठी एकत्र येण्याचं आवाहन आहे.. पण एक अट आहे, जेव्हा आम्ही लोकसभेला सांगत होतो, हे सगळे उद्योग घेऊन गुजरातला जात आहेत, तेव्हाच विरोध केला असता तर महाराष्ट्र हिताचं सरकार केंद्रात आणि राज्यात बसवू शकलो असतो. तेव्हा पाठिंबा द्यायचा, आता विरोध करायचा मग परत तडजोड करायची हे असं नाही चालणार. महाराष्ट्र हिताच्या आड जो कोणी येईल, त्याचं स्वागत मी करणार नाही, त्याला घरी मी बोलवणार नाही, त्याच्यासोबत पंक्तीला



बसणार नाही, त्याचं आगत स्वागत करणार नाही, हे पहिलं ठरवा, मग महाराष्ट्र हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यातली भांडणं मी आज सांगतो, जी भांडणं माझ्याकडून नव्हतीच, ती मी मिटवून टाकली चला, पण पहिलं हे ठरवा. उद्धव ठाकरे म्हणाले, मराठी माणसाचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी शिवसेनेचा जन्म झाला आहे...प्रत्येक कामगाराचा शाखेसोबत समन्वय झालाच पाहिजे...खूप जणांना काही देता नाही आला तरीसुद्धा ते हिंदुत्वासाठी आणि पक्षासाठी माझ्यासोबत राहिले...आज सुद्धा कायदे आणलेत कामगारांचे त्याला विरोध केलाच पाहिजे...पण निवडणुकीच्या वेळेला आपण विस्कळीत असतो.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, आम्ही महाराष्ट्राचे मराठी कडवट आहोत. शेतकऱ्यांचे कार्य कायदे आले तेव्हा शेतकरी रस्त्यावर उतरला तसा कामगार रस्त्यावर उतरला नाही...त्यांचा मिशन हेच आहे की कोणी एकत्र आला नाही पाहिजे. आपल्याला भांडणात गुंतवून ठेवून यांचे काय चाळे चालले आहेत ते पाहा...मुंबईत सुद्धा काही गोष्टी अदानीच्या कशात घालायच्या. आणि तुम्ही त्यावर बोलू नये म्हणून तुम्हाला भांडणात व्यस्त ठेवायचं...आता काय दुर्दैवाने सरकार आलं आहे ते आता जाहीरनाम्यावर काहीच कोणीच बोलत नाही. तुम्ही मारलेला थापा ऐकून मतदान केलं असं आपण एक वेळ म्हणू...पण त्यावर आता कोणीच बोलत नाही.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना एकत्र येण्यासाठी साद घातली होती. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनीही त्यावर सकारात्मक प्रतिक्रिया दिली. मात्र, त्यांनी युतीसाठी काही स्पष्ट अटी मांडल्या आहेत. "मी देखील मराठी माणसासाठी, महाराष्ट्राच्या हितासाठी किरकोळ भांडणं बाजूला ठेवायला तयार आहे," असं उद्धव ठाकरे यांनी सागितलं. ते मुंबईतील एका कार्यक्रमात बोलत होते. राज ठाकरेंच्या वक्तव्याला उत्तर देताना उद्धव ठाकरे म्हणाले, "माझी एक अट आहे. महाराष्ट्राच्या हितास आड येणाऱ्यांचं समर्थन मी करणार नाही. त्यांच्या घरी जाणार नाही, त्यांना घरी बोलवणार नाही, त्यांच्या पंगतीला बसणार नाही. हे आधी ठरलं पाहिजे."

ते पुढे म्हणाले, "लोकसभा निवडणुकीच्या वेळी आम्ही सांगत होतो की, राज्यातून उद्योग गुजरातला जात आहेत. त्यावेळी विरोध केला असता, तर आज केंद्रात महाराष्ट्राच्या हिताचं सरकार असतं. पण तेव्हा पाठिंबा दिला आणि आता विरोध करत आहेत. याला तडजोड म्हणता येणार नाही." उद्धव ठाकरे यांनी सर्व मराठी जनतेला एकत्र येण्याचं आवाहन करताना म्हटलं, "आज ठरवा की भाजपसोबत जायचं की माझ्यासोबत. मी गद्दार नाही, माझी शिवसेना खरी आहे."

"हिंदुत्व आणि मराठी माणसाच्या हिताचं निर्णय घ्या. विरोध करायचा की निस्वार्थ पाठिंबा द्यायचा हे ठरवा. महाराष्ट्राचं हित हाच एकमेव निकष आहे. चोरांना पाठिंबा न देता, छुप्या भेटी न घेता आणि प्रचार न करता छत्रपती शिवाजी महाराजांसमोर शपथ घ्या," असं स्पष्ट मत उद्धव ठाकरे यांनी मांडलं.

### उद्धव ठाकरे नेमकं काय म्हणाले?

"मराठीच्या आणि महाराष्ट्राच्या हितासाठी अगदी किरकोळ भांडणं... तुम्ही बाहेर गेल्यानंतर तुम्हाला कळेल की किरकोळ भांडणाचा संदर्भ काय आहे? किरकोळ भांडण बाजुला ठेवायला मी सुद्ध तयार आहे. मी सर्व मराठी माणला महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येण्याचं आवाहन करतो. पण माझी अट एक आहे. जेव्हा लोकसभेच्यावेळी आम्ही सांगत होतो की, महाराष्ट्रातून हे गुजरातला सर्व कारभार घेऊन जात आहेत. तेव्हाच जर विरोध केला असता तर ते सरकार तिथं बसलं नसतं. आज महाराष्ट्राच्या हिताचा विचार करणार सरकार आपण केंद्रात बसवलं असतं. तसंच राज्यात सुद्धा आपल्या महाराष्ट्राचा विचार करणार सरकार आपण बसवलं असतं. पण तेव्हा पाठिंबा द्यायचा आणि आता विरोध करायचा आणि परत तडजोड करायची हे चालायचं नाही. महाराष्ट्रात हिताच्या आड जो कोणी येईल त्याचं स्वागत मी करणार नाही, त्याला मी घरी बोलावणार नाही, त्याच्या घरी मी जाणार नाही, त्याच्या पंक्तीला मी बसणार नाही. हे आधी ठरवा, मग महाराष्ट्र हिताच्या गोष्टी करा.

## पारेषण कंपनीच्या टॉवर लाईनला शेतकऱ्यांचा विरोध

### वाहोलीच्या शेतकऱ्यांनी केले काम बंद!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**कल्याण :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण पारेषण कंपनीकडून पडघा भादाणे ते मुरबाड तालुक्यातील मालेगांव पर्यंत इलेक्ट्रोड टॉवर लाईन टाकण्याचे काम सुरू आहे. परंतु यातील बाधित शेतकऱ्यांना ना नोटीस, ना काही सूचना न देताच जबरदस्तीने सुरू असलेले लाईन टाकण्याचे काम आज वाहोलीच्या शेतकऱ्यांनी बंद पाडले,तथापि कल्याण शेतकऱ्यांनी याला विरोध केला असून अगोदर मोबदला, नंतर काम अशी भूमिका घेतली आहे.अगोदरच, समृद्धी महामार्ग, मुंबई वडोदरा एक्स्प्रेस, कल्याण मुरबाड महामार्ग मध्ये तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात जमिनी बाधित झाल्या आहेत, उपजीविका करण्याइतपत शेती शिल्लक राहिली असताना आता परत या जमिनीतून पडघा ,भादाणे ते मालेगाव पर्यंत इलेक्ट्रोड टॉवर लाईन टाकण्याचे काम मराविवि पारेषण कंपनीकडून सुरू आहे, वाहोली गावातील विधवा महिला नायजा सैजाद सेंदू यांच्या जागेवर जेसीबी ने खोदकाम सुरू असताना शेतकऱ्यांनी तेथे धाव घेतली व हे काम बंद पाडले, आम्हाला नोटीस नाही, सूचना नाही, मोबदला किती देणार ते माहिती नाही, मग आमच्या जमीनी कशा घेतात असा प्रश्न उपस्थित केला. जोपर्यंत मोबदला नाही तोपर्यंत काम करू देणार नाही असा पवित्रा येथील शेतकऱ्यांनी घेतला. यावेळी येथे अड अविश जुवारी, जफर आब्दुला, गणी जुवारी, इजांज जुवारी, मुंजमीन पटेल, व इतर शेतकरी उपस्थित होते.दरम्यान या टॉवर लाईन ला शेतकऱ्यांचा विरोध आहे. आमचा विरोध आहे. डावलून पोलीस बळाचा वापर करून आमच्या जमिनी घेतल्यास मिडिया समोर याच टॉवर ला फास घेऊन आम्ही आत्महत्या करण्याचा इशारा या शेतकऱ्यांने दिला आहे,यावेळी पोलीस, शेतकरी तसेच रायते येथील नरेश सुरोशे आदी उपस्थित होते.

## कळू धरणाच्या उभारणीसाठी वन विभागाला पर्यायी जागा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** ठाणे जिल्ह्याला आगामी काळात पिण्याचे पाणी पुरवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या काळू धरणाचे काम वन विभागाला पर्यायी जमिनी न दिल्यामुळे रखडले आहे. हे काम शीघ्रगतीने व्हावे यासाठी धरण उभारणीत बुडिताखाली जाणाऱ्या विभागाच्या वन जमिनीला पर्यायी जमीन देण्यासाठी पालघर जिल्ह्यात शासकीय जागेचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. ठाणे जिल्ह्यात मुरबाड तालुक्यात काळू धरण बांधण्यात येत आहे. धरणाची उभारणी कालमर्यादेत करण्यात यावी तसेच प्रशासकीय कामांना गती मिळण्याच्या दृष्टीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदामंत्री गिरीश महाजन तसेच वरिष्ठ अधिकारी यांची बैठक मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. बैठकीत पालघरच्या जिल्हाधिकारी तसेच पालघर व ठाणे जिल्ह्यातील वन विभागाचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

काळू धरण वन विभागाच्या जमिनीवर बांधण्यात येत आहे. या धरणाच्या उभारणीत वनविभागाची सुमारे ९०० हेक्टरपेक्षा अधिक जमीन जाणार आहे. यातील ४४० हेक्टर जमीन बीड जिल्ह्यात प्राप्त झाली आहे. उर्वरित ५७१ हेक्टर जमीन पालघर जिल्ह्यातील महसूल विभागाकडे असणाऱ्या मोकळ्या जागेतून उपलब्ध करावी असे या बैठकीत सूचित करण्यात आले आहे. यासंदर्भात पाहणी करून सोमवारपर्यंत अहवाल मंत्रालयात पाठवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



## राज्यातील ९७ बाजार समित्या तोट्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील ३०६ पैकी ९७ बाजार समित्या तोट्यात आहेत. अद्याप ३० बाजार समित्यांना स्वः मालकीची जागा नाही. ८१ बाजार समित्यांमध्ये पायाभूत सोयी सुविधा नाहीत. ६२१ उपबाजार आवारांचा विकास झालेला नाही. तोट्यातील ४१ बाजार समित्या रद्द किंवा विलिनीकरण करण्याची शिफारस अभ्यास गटाने केली आहे. तरीही नव्याने ६५ तालुका बाजार समित्या स्थापन करण्याचे आदेश देऊन सरकारने देऊन केंद्र सरकारच्या शेतीमाल नियनमुक्तीच्या धोरणाला हारताळ फासला आहे.

तत्कालीन कृषी आयुक्त डॉ. उमाकांत दागट यांच्या अभ्यास गटाने २०२३-२४ मध्ये सादर केलेल्या अहवालातील निरीक्षणे आणि शिफारशी डोळयात अंजन घालणाऱ्या आहेत. अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे, राज्यात महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री अधिनियम १९६३ नुसार एकूण ३०६ बाजार समित्या आणि ६२१ उपबाजार कार्यरत आहेत. २०२३- २४ मध्ये आर्थिक उलाढालीनुसार ९७ बाजार समित्या तोट्यात आहेत.

तीस बाजार समित्यांकडे स्वः मालकीची जमीन नसल्यामुळे बाजार आवार विकसीत झालेला नाही. ८१ बाजार समित्यांमध्ये शेड, रस्ते, संरक्षक भिंती, शेतकरी निवास, स्वच्छतागृह, वीज, पिण्याचे पाणी आदी सोयी नाहीत. ६२१ उपबाजार आवार विकासाच्या प्रतीक्षेत आहेत. शेतीमाल विक्रीचे केंद्रीकरण जिल्हा बाजार समित्यांमध्ये होत असल्यामुळे तालुका बाजार समित्या तोट्यात आहेत. अनेक बाजार समित्यांकडे बाजार आवार असूनही कोणतीही उलाढाल होत नाही, असे निरीक्षण नोंदवून क वर्गातील ३१ आणि ड वर्गातील ४२, अशा ५३ बाजार समित्या रद्द करून त्यांचे जवळच्या सक्षम बाजार समित्यांमध्ये विलिनीकरण करावे, अशी शिफारस करूनही पुन्हा ६५ तालुका बाजार समित्या स्थापन करण्याचा घाट घातला जात आहे.

### केंद्र सरकारच्या निर्णयाला हारताळ

केंद्र सरकारने शेतीमाल नियनमुक्तीचे धोरण स्विकारले आहे. राज्य सरकारने वेळोवेळी फळे, भाजीपाला, दुग्धजन्य पदार्थ नियमुक्त केल्यामुळे त्यांची खरेदी विक्री कुठेही होऊ शकते. नियमनुक्तीच्या धोरणामुळे देशात राज्यात सर्वाधिक १२४ खासगी बाजार सुरू आहेत. ई- नाम, व्यवस्थेअंतर्गत कोट्यवधींची खरेदी विक्री होत आहे. खासगी बाजार समित्यांना अनेक नियमांतून सूट दिलेली आहे. त्यामुळे खासगी बाजारांची उलाढाल वेगाने वाढत आहे. दुसरीकडे सरकारी बाजार समित्या दिवसोंदिवस आर्थित गर्तेत जाताना दिसत आहेत.

## मुरबाड तालुक्यातील जलजीवन योजनेच्या कामांवर आमदार किसन कथोरे नाराज

### पाणी टंचाईकडे लक्ष देण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड -प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्याच्या ग्रामिण भागात सध्या पाणी टंचाईचे चटके जाणवू लागले आहेत. उद्भवलेल्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी 2022 पासून सुरु असलेल्या जलजिवन मिशन योजनेच्या संबंधित शासकीय यंत्रणा व ठेकेदार यांच्या संथ व हलगर्जी पणावर नाराजी व्यक्त करत 40 ठेकेदारांवर मुख्याधिकारी ठाणे यांना कारवाईचे आदेश दिले असल्याचे आज मुरबाड येथिल झालेल्या भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात सांगितले असून कार्यकर्ताना पाणी टंचाईवर लक्ष देण्याच्या सूचना यावेळी आमदार कथोरे यांनी केल्या.

मुरबाड येथे आज भाजपा कार्यकर्त्यांचा मेळावा आज आमदार किसन कथोरे व भाजपा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.

यावेळी उपस्थित कार्यकर्ताना आमदार कथोरे यांनी पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणूकासाठी तयारीला लागण्याचे आदेश दिले असून पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्ताला योग्य न्याय मिळणार असल्याचे सांगितले. तर लवकरच भाजपा मुरबाड तालुक्यासाठी मुरबाड पश्चिम मंडळ व पुर्व मंडळ असे दोन तालुका अध्यक्ष दिले जाणार असून त्यासाठी पक्षाच्या धोरणानुसार मतदान प्रक्रियेने निवड केली जाणार असल्याचे समजते.

दरम्यान तालुक्यातील सध्या पाणी समस्येने गंभीर रूप धारण केले असून तालुक्यातील अनेक गाव-पाड्यावर महिला पाणी टंचाईने त्रस्त आहेत. त्यामुळे अनेक महिला पाणी टंचाईच्या समस्या घेऊन आमदार महोदयांना प्रत्यक्ष भेटून किंवा फोन द्वारे समस्या सांगत असल्याने आमदार कथोरे यांनी पांढरे कपडे घालून टेंभा मिरवणारे कार्यकर्त्यांची चांगलीच कान उघाडणी यावेळी केली आहे. आपल्याच घरातील महिलांना पाण्यासाठी झगडावे लागत असेल तर मग कार्यकर्ते काय करतात असा सवाल उपस्थित केला. पाणी पुरवठा योजनेच्या निधी बाबतीत निश्चित उशीर झाला असून तो ही लवकरच उपलब्ध केला जाणार असल्याचे यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

या मेळाव्याला आमदार किसन कथोरे, संघटन मंत्री हेमंत म्हात्रे, जिल्हा अध्यक्ष जितेंद्र डाकी, राज्य कार्यकारिणी सदस्य भरत पाटील, नितीन मोहपे, तालुक्यातील भाजपाचे बुथ प्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख, वॉरियर्स, भाजपाचे माजी पंचायत समिती सदस्य,जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक, सरपंच ,प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बदलापुरातील एक नंबरचा फलाट कायमचा बंद होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** जानेवारी 24 मध्ये मध्य रेल्वे प्रशासनाने होम प्लॅटफॉर्म बंद करण्याचा घेतलेल्या निर्णयाला स्थगिती दिली होती. लोकसभा निवडणुकांच्या आधी मध्य रेल्वे प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाला बदलापूरतील रेल्वे प्रवाशांनी केलेल्या कडाडून विरोधानंतर तत्कालीन खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनीही विरोध केल्यामुळे बदलापूर रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक एक बंद करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने तात्पुरता स्थगित केला होता. आता मात्र रेल्वे प्रशासनाने हा तुघलकी निर्णय पुन्हा एकदा जाहीर करून शनिवारी आणि रविवारी रात्री यासाठी मेगाब्लॉक जाहीर केला आहे. याबाबत प्रवाशांमध्ये कुठेही वाच्यता होऊ नये म्हणून अत्यंत गोपनीयता पाळण्यात आली आहे. सध्या अस्तित्वात असलेला प्लॅटफॉर्म क्रमांक एक हा कायमस्वरूपी रेलिंग लावून बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे बदलापूर पूर्वेकडे राहणाऱ्या प्रवाशांना मोठी फरपट होणार आहे. इतकच नाही तर पूर्वेकडील प्रवाशांना पश्चिमेकडे जाऊन मग प्लॅटफॉर्म क्रमांक एक वरून ( सध्याच्या होम प्लॅटफॉर्म) वरून गाडी पकडावी लागणार आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने बदलापूरकरांची केलेली ही शुद्ध फसवणूक असून होम प्लॅटफॉर्मच्या नावाखाली बदलापूरकरांना मध्य रेल्वेच्या या प्रशासना विरोधात बदलापुरातील रेल्वे प्रवासी अत्यंत आक्रमक भूमिका घेण्याच्या मनस्थितीत आहेत. होम प्लेट फॉर्म हा एक नंबर जाहीर करण्यात येणार आहे त्यामुळे कर्जत आणि खोपोलीला जाणाऱ्या प्रवाशांना ह याचा मोठा फटका सहन करावा लागणार आहे कारण कर्जत खोपोलीला जाणारे अनेक प्रवासी हे बदलापूर गाडीने बदलापूर स्थानकावर येऊन त्याच स्थानकावर उतरून नंतर कर्जत गाडी पकडत होते आता मात्र त्यांना प्लॅटफॉर्म क्रमांक एक वर उतरून सध्याच्या होम प्लॅटफॉर्मवर उतरून जिन्याने पुन्हा या दुसऱ्या म्हणजे सध्या असलेल्या प्लॅटफॉर्म क्रमांक दोन वर गाडी पकडण्यासाठी यावे लागणार आहे यामध्ये लहान मुले गरोदर स्त्रिया आभाळविरुद्ध यांना याचा मोठा फटका सहन करावा लागणार आहे तर यामुळे वेळही खर्च होणार असल्यामुळे मध्य रेल्वे प्रशासनाच्या या तुगलकी निर्णयाचा फटका फक्त बदलापुरातील रेल्वे प्रवाशांनाच बसणार नसून बदलापूर ते कर्जत खोपोली आणि पुण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांना ही याचा मोठा फटका सहन करावा लागणार आहे.सध्या बदलापुरातील प्लॅटफॉर्म क्रमांक एक वरुन मुंबई सीएसटीच्या दिशेने गाड्या सुटतात. होम प्लॅटफॉर्म चे काम लवकरच पूर्ण होणार असल्याने सध्या या ठिकाणी प्रवाशांना दिलासा मिळत असतानाच गाजर दाखवून बदलापूरकरांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार मध्य रेल्वेने प्रशासनाने केल्याची भावना बदलापुरातील संतप्त रेल्वे प्रवासी व्यक्त करत आहेत. प्लॅटफॉर्म क्रमांक एक आणि दोन वर लिफ्ट बसवणे एक्सलेटर लावणे अशी कामे करावयाची असल्याचे सांगत प्लॅटफॉर्म क्रमांक एक वर बॅरिकेटिंग बसवून ते पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय मध्य रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे जे प्रवासी पूर्वी प्लॅटफॉर्म क्रमांक एक आणि होम प्लॅटफॉर्मवरून मुंबई दिशेला जात होते त्या सर्व प्रवाशांना आता होम प्लॅटफॉर्मवर जाऊन मुंबई सीएसएमटीच्या दिशेला गाडी पकडावी लागणार आहे. अर्धवट अवस्थेत असलेली काम आणि होम प्लॅटफॉर्मची अपुरी जागा यामुळे प्रवाशांची मोठी गर्दी या प्लॅटफॉर्मवर होण्याची शक्यता आहे. तसेच अनेक वेळा मुंबई सीएसएमटीला जाणारी गाडी ही प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर थांबविले जाते. त्यामुळे जर असा प्रकार घडल्यास मोठा गडबड गोंधळ होऊन जीवित हानी होण्याची ही शक्यता नाकारता येत नाही. तसेच ज्या प्रवाशांना वांगणी ते कर्जत पुणे किंवा खोपोलीपर्यंत प्रवास करायचा आहे ते अनेक प्रवासी बदलापूर करणे येऊन बदलापूर स्थानकात उतरत होते त्यांनाही आता कर्जत गाडी पकडण्यासाठी संपूर्ण प्लॅटफॉर्मवर ब्रिज चढून प्लॅटफॉर्म क्रमांक दोन वर यावे लागणार आहे. रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुंबईमध्ये बसून निर्णय घेताना स्थानिक परिस्थितीचा कोणताही विचार न करता थेट बॅरिकेटिंग से काम सुरू करून बदलापुरातील रेल्वे प्रवाशांना आणि स्थानिक लोकप्रतिनिधींना जूमानत नसल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. बदलापुरात आधीच रेल्वे गाड्यांची संख्या कमी आहे. त्यात सुविधांची वाणवा असताना मध्य रेल्वे प्रशासन ठेकेदारांचे तळे उचलण्यासाठी प्रवाशांना भेटीत धरत असल्याने बदलापुरातील प्रवासी संताप व्यक्त करत आहेत. भीक नको पण कुत्रा आवर असं या कामाच्या निमित्ताने म्हणण्याची वेळ आता बदलापूरकरांवर आली आहे.

Jeevandeep Shaikshanik Sanstha Poi's
NIRMAL ENGLISH MEDIUM SCHOOL
शासनमान्यता क्र. नप्राश / १००८ प्र.क्र. ६०१ / प्रा.शि-३ नुसार
NURSERY, JR.KG & SR.KG, STD 1ST TO 10TH
Teaching Is Our Passion & Your Child Is Our Priority
NO DONATION ONLY EDUCATION
2025-26 ADMISSION OPEN
Goveli — At. Goveli, Tal. kalyan, Dist. Thane 421301
Titwala — 457/1 Ekvira Niwas Sai Baba Mandir Road Near Mahaganpati Mandir Titwala (East) 421605
7448270162 / 8691938780 / 9619188558

# राष्ट्रसंघ संस्था बरखास्त!

## संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेमध्ये रुपांतर

आंतरराष्ट्रीय सुरक्षा व शांतता यांच्या संवर्धनार्थ राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती. पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा फार महत्वाची असते हे तज्ज्ञांच्या लक्षात आले होते. त्यामुळे युद्धाच्या अखेरीस स्मट्स, लॉर्ड रॉबर्ट सेसिल, लिऑं बूर्वा यांसारख्या मुस्तद्दी व्यक्तींनी पुढाकार घेऊन भिन्न राष्ट्रांची एक संस्था असावी या कल्पनेचा पुरस्कार केला. त्यानंतर वुड्रो विल्सन यांनी अमेरिकेच्या प्रितिनीधीगृहात १९९८ मधे चौदा कलमी शांतता कार्यक्रम सादर केला. त्यातील शेवटच्या कलमात राष्ट्रसंघ निर्मितीची कल्पनी मांडण्यात आली होती. महायुद्ध संपल्यानंतर झालेल्या व्हर्सायच्या करारात सुरुवातीच्या अनुच्छेदानुसार राष्ट्रसंघाची घटना समाविष्ट करण्यात आली होती.



अमेरिकेची संयुक्त संस्थाने, ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, इटली आणि जपान यांच्या पुढाकाराने राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली. सभासद राष्ट्रांनी आपापल्या घटनात्मक तरतुदीनुसार या आंतरराष्ट्रीय करारावर शिक्कामोर्तब केल्यानंतर १० जानेवारी १९२० रोजी राष्ट्रसंघाचे कार्यालय जिनीव्हा (स्वित्झर्लंड) येथे कार्यान्वित झाले. मात्र ही राष्ट्रसंघ फार काळ तग धरू शकला नाही. आजच्याच दिवशी राष्ट्रसंघ ही संस्था बरखास्त करून पुढे याचेच संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेमध्ये रुपांतर करण्यात आले. त्यामागे नेमकी काय कारणं होती ते जाणून घेऊया.
राष्ट्रसंघाच्या स्थापनेसाठी खुद्द विल्सन यांनी पुढाकार घेतला असला तरी ते राहात असलेला देश अमेरिका मात्र या राष्ट्रसंघाचा सभासद होऊ शकला नव्हता. कारण अमेरिकन राज्यघटनेनुसार आंतरराष्ट्रीय कराराच्या स्वीकृतीसाठी अमेरिकन सिनेटची संमती आवश्यक असते मात्र सिनेटने ती नाकारली होती. सुरुवातीच्या काळात एकूण ४२ राष्ट्रांनी राष्ट्रसंघाचे सदस्यत्व स्वीकारले होते. त्यात जेती राष्ट्र-ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, इटली, जपान यांचा समावेश होता. राष्ट्रसंघाच्या घटनेनुसार स्वायत्त असलेल्या वसाहतींनाही सभासदत्व खुले असल्याने हिंदुस्थानला राष्ट्रसंघाचे सभासदत्व मिळाले.

संघटनात्मकदृष्ट्या राष्ट्रसंघाचे तीन महत्वाचे घटक होते. प्रतिनिधिगृह, कार्यकारी मंडळ आणि सचिवालय. यांशिवाय राष्ट्रसंघाशी संलग्न अशा दोन स्वायत्त संघटना स्थापण्यात आल्या होत्या. आंतरराष्ट्रीय न्यायालय आणि आंतरराष्ट्रीय मजूर संघटना. राष्ट्रसंघाच्या घटनेनुसार स्वातंत्र्याचे आणि प्रादेशिक एकसंधतेचे परकीय आक्रमणापासून रक्षण करत देशांतील मतभेद यांबाबतच्या समस्या आंतरराष्ट्रीय कार्यालय किंवा राष्ट्रसंघाच्या कार्यकारी मंडळाकडे सोपवण्यात येत असे. राष्ट्रसंघाच्या प्रतिनिधिगृहात प्रत्येक सभासद राष्ट्रास एका मताचा अधिकार होता. ब्रिटन, फ्रान्स, इटली, जपान, जर्मनी आणि सोव्हिएट रशिया असे सहा कार्यकारिणीचे कायम सभासद असतात. राष्ट्रसंघाने स्थापनेनंतर सुरुवातीच्या काळात चांगले कार्य केले. राष्ट्रसंघाने सुरुवातीस स्वीडन-फिनलंडमधील अलांड बेटासंबंधीचा तंटा (१९२०-२१) समझोत्याने मिटविला आणि अल्बेनियाला सुरक्षिततेची हमी दिली. ऑस्ट्रियाला आर्थिक अनर्थातून वाचविले आणि अप्पर सायलीशियाचे विभाजन केले (१९२२). यांशिवाय राष्ट्रसंघाने युद्धांतील निर्वासितांनाही साहाय्य केले. गरजू राज्यांना आर्थिक सहकार्य केले. कामगारांचे आयुष्य, मद्य पदार्थांच्या व्यापारास प्रतिबंध इ. विविध क्षेत्रांत राष्ट्रसंघाने सर्वेक्षणातून संशोधन करून माहिती गोळा केली आणि आंतरराष्ट्रीय परिषदा भरवून विधिनियमांचे मसुदे तयार केले तसेच जागतिक लोकमत जागृत व प्रशिक्षित केले; मात्र आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा यांबाबतीत कोणत्या पद्धतीने राष्ट्रसंघाने कार्य करावे, याबद्दल बड्या सभासद राष्ट्रांचा दृष्टिकोन समान नव्हता.

उदा., व्हर्साय तहाच्या लष्करी कलमांची अंमलबजावणी करण्याचे एक साधन म्हणून फ्रान्सने राष्ट्रसंघाकडे पाहिले; कारण जर्मनीचे लष्करी खच्चीकरण, हे त्याचे प्रमुख राजकीय उद्दिष्ट होते. याउलट ग्रेट ब्रिटनच्या दृष्टिकोनातून राष्ट्रसंघ म्हणजे आंतरराष्ट्रीय वाद शांततेच्या मार्गाने सोडविण्याची एक यंत्रणा होती. आपली साम्राज्यव्यवस्था अडचणीत येईल, अशी कोणतीही आंतरराष्ट्रीय जबाबदारी राष्ट्रसंघाद्वारे स्वीकारण्याची ग्रेट ब्रिटनची तयारी नव्हती. अशा रीतीने सामूहिक सुरक्षिततेच्या कार्यासंबंधी दोन बड्या राष्ट्रांमध्ये भिन्न दृष्टिकोन अस्तित्वात होते. एकूण सर्वच सभासद राष्ट्र आपापल्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या मर्यादित संदर्भातच राष्ट्रसंघाकडे पाहत असत. याशिवाय सामूहिक सुरक्षिततेच्या दृष्टीने राष्ट्रसंघाच्या मूलभूत रचनेत महत्त्वाची उणीव होती.

राष्ट्रसंघाच्या घटनेच्या बाराव्या अनुच्छेदानुसार सर्व सभासद राष्ट्रांवर असे बंधन होते, की त्यांनी आपले प्रश्न आंतरराष्ट्रीय लवाद, आंतरराष्ट्रीय न्यायालय किंवा कार्यकारिणी यांपैकी कोणत्यातरी एका यंत्रणेकडे सोपवावेत आणि त्यांचा निर्णय जाहीर झाल्यानंतर किमान तीन महिन्यांच्या मुदतीत युद्धमार्गाचा अवलंब करू नये. याचा अर्थ, या व्यवस्थेत सभासद राष्ट्रांच्या युद्धाचा अवलंब करण्याच्या सार्वभौम अधिकारास पूर्ण व निरपवाद प्रतिबंध केलेला नव्हता. तो अधिकार केवळ काही प्रमाणात मर्यादित केलेला होता.

राष्ट्रसंघाचं अस्तित्व दोन दशक कायम होतं. मात्र या दोन दशकाच्या काळात त्यांना अनेक पेचप्रसंगांना सामोरे जावे लागले. जपानने १९३१ मध्ये चीनवर आक्रमण करून मँचुरियामध्ये आपली सत्ता स्थापली. राष्ट्रसंघाने जपानविरुद्ध प्रभावी कारवाई न करता जपानचा केवळ निषेध केला. त्यानंतर १९३४ मध्ये इटलीने इथिओपियावर (ॲबिसिनिया) आक्रमण केले परंतु ग्रेट ब्रिटन आणि फ्रान्सच्या दृष्टिकोनातून जर्मनीतील नाझी शक्तीचा प्रश्न अधिक चिंतेचा होता.

ॲडॉल्फ हिटलरच्या नेतृत्वात अल्पावधीत बळकट झालेल्या जर्मनीविरुद्ध फळी उभारण्यात इटलीचा बफर म्हणून उपयोग होईल, या अपेक्षेने त्यांनी इटलीच्या आक्रमणाकडे कानाडोळा केला. राष्ट्रसंघाने खूप उशिरा इटलीविरुद्ध आर्थिक कारवाई केली आणि त्या कारवाईतही गंभीर उणिवा होत्या. रशियाने फिनलंडवर हल्ला केला म्हणून राष्ट्रसंघाने त्याचा प्रथम निषेध केला आणि नंतर १४ डिसेंबर १९३९ रोजी त्याचे सभासदत्व रद्द केले.

अशाप्रकारे महासत्तांतील सत्तासंतुलनाच्या राजकारणात राष्ट्रसंघ निष्प्रभ ठरला. आर्थिक-सामाजिक योजनांच्या संदर्भात या संघटनने भरीव व विधायक कार्य केले आणि दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेसाठी भक्कम पार्श्वभूमी तयार केली. मात्र संयुक्त राष्ट्रसंघ ही राष्ट्रसंघाची सुधारित आवृत्ती आहे असं म्हणायाल हरकत नाही. राष्ट्रसंघ जास्त काळ न टिकण्यामागे अनेक कारणं आहेत. या संघटनेस सुरुवातीपासून काही देशांनी प्रतिसाद दिला नाही. राष्ट्रसंघाकडे लष्करी सामर्थ्य नसल्यामुळेच जपान, इटली, जर्मनी, रशिया ह्यांना आक्रमक धोरणांपासून राष्ट्रसंघ परावृत्त करू शकला नाही. तसेच इतरही अनेक उणिवा राष्ट्रसंघाच्या मूळ रचनेतच होत्या. ज्यामुळे महायुद्धाकडे घसरत जाणारे युरोपचे राजकारण थोपविण्यात राष्ट्रसंघ पूर्णपणे असमर्थ ठरला. आणि दुसऱ्या महायुद्धाचा जन्म झाला.

## गीतासार



### अध्याय ८
### अक्षरब्रह्मयोगः

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन । मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ॥ ८-१६ ॥

हे अर्जुना, ब्रह्मलोकापर्यंतचे सर्व लोक पुनरावर्ती आहेत. परंतु हे कौन्तेया(कुंतीपुत्र अर्जुना), मला प्राप्त झाल्यावर पुनर्जन्म होत नाही. (कारण मी कालातीत आहे आणि हे सर्व ब्रह्मादिकांचे लोक कालाने मर्यादित असल्याने अनित्य आहेत.) ॥ ८-१६ ॥

सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः । रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥ ८-१७ ॥

ब्रह्मदेवाचा एक दिवस एक हजार चतुर्युगांचा असून रात्रही एक हजार चतुर्युगांची असते. जे योगी हे तत्त्वतः जाणतात, ते काळाचे स्वरूप जाणणारे होत. ॥ ८-१७ ॥

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे । रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसञ्ज्ञके ॥ ८-१८ ॥

सर्व चराचर भूतसमुदाय ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या आरंभी अव्यक्तापासून म्हणजे ब्रह्मदेवाच्या सूक्ष्म शरीरापासून उत्पन्न होतात आणि ब्रह्मदेवाच्या रात्रीच्या आरंभी त्या अव्यक्त नावाच्या ब्रह्मदेवाच्या सूक्ष्म शरीरात विलीन होतात. ॥ ८-१८ ॥

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते । रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ ८-१९ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), तोच हा भूतसमुदाय पुन्हा पुन्हा उत्पन्न होऊन प्रकृतीच्या अधीन असल्यामुळे रात्रीच्या आरंभी विलीन होतो व दिवसाच्या आरंभी पुन्हा उत्पन्न होतो. ॥ ८-१९ ॥

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः । यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥ ८-२० ॥

त्या अव्यक्ताहून फार पलीकडचा दुसरा अर्थात विलक्षण जो सनातन अव्यक्त भाव आहे, तो परम दिव्य पुरुष सर्व भूते नाहीशी झाली, तरी नाहीसा होत नाही. ॥ ८-२० ॥

## आरोग्य


### कच्च्या पपईचे फायदे



1. पचन सुधारते: कच्च्या पपईमध्ये पपेन नावाचे एंजाइम असते जे प्रथिने पचवण्यास मदत करते. उन्हाळ्यात जेव्हा जड अन्न पचवणे कठीण असते, तेव्हा हा रस पोट हलके ठेवण्यास मदत करतो आणि गॅस आणि बद्धकोष्ठता सारख्या समस्यांपासून आराम देतो.
2. वजन कमी करण्यास उपयुक्त: कमी कॅलरीज आणि उच्च फायबर सामग्रीमुळे, हा रस भूक नियंत्रित करतो आणि पोट बराच वेळ भरलेले वाटते. हे चयापचय वाढवून वजन कमी करण्याची प्रक्रिया वेगवान करते.
3. डिटॉक्सिफिकेशनसाठी उत्तम: कच्च्या पपईचा रस यकृत आणि मूत्रपिंडांना विषमुक्त करण्यास मदत करतो. हे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकते, पेशींचे पुनरुत्पादन करते आणि त्वचा स्वच्छ करते.
4. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते: व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असलेला हा रस शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतो आणि विषाणूजन्य संसर्ग किंवा हंगामी तापांपासून संरक्षण प्रदान करतो.
5. त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर: यामध्ये असलेले व्हिटॅमिन ए आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेला आतून पोषण देतात. हे त्वचेची चमक टिकवून ठेवते, डाग कमी करते आणि केस मजबूत आणि दाट बनवते.

## कल्याण आळेफाटा राष्ट्रीय महामार्गाची दूरावस्था

### आम्ही नगरकर प्रतिष्ठान व स्फूर्ती फाउंडेशनचा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मागील काही वर्षांपासून राष्ट्रीय महामार्ग -६१ कल्याण -माळशेज घाट- आळेफाटा रस्तावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून छत्रपती शिवाजी महाराज जन्मस्थान शिवनेरी किल्ला, भिमाशंकर देवस्थान तसेच या रस्त्याने जाणार्या गावाकडे जाणार्या रस्त्याची बकाल अवस्था झाल्यामुळे नागरीक तीव्र सतंपा व्यक्त करत आहेत.

नागरिकांच्या तक्रारीं नुसार आम्ही नगरकर प्रतिष्ठान व स्फूर्ती फाउंडेशन वतीने ठाणे बांधकाम विभाग, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय व संबंधितांना निवेदन देण्यात आले असून लवकरच त्वरित कार्यवाही न झाल्यास 1 मे महाराष्ट्र दिन रोजी आम्ही नगरकर प्रतिष्ठान व स्फूर्ती फाउंडेशन वतीने कल्याण -माळशेजघाट रास्ता रोको आंदोलनाचा इशारा देण्यात आला असल्याची माहिती आम्ही नगरकर मुंबई संघचे अध्यक्ष मंगेश शेळके, कार्याध्यक्ष बजरंग तांगडकर यांच्या वतीने निवेदन देऊन माहिती देण्यात आली.

## उपचाराचे एवढे बिल कसं वाढत?

### मनसेचा खाजगी रुग्णालयांवर मोर्चा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




डोंबिवली : दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील गर्भवती महिलेच्या मृत्यूनंतर जनता प्रचंड संतापली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आता यावर लक्ष केंद्रीत करत उपचाराचे एवढे बिल कसं वाढत? याचा जाब विचारण्याकरता मनसेचा डोंबिवलीतील खाजगी रुग्णालयांवर मोर्चा वळणार आहे. डोंबिवलीतील अनेक खाजगी रुग्णालयांतील उपचारची बिल पाहून रुग्णांचे नातेवाईक मनसेच्या शाखेतआपली समस्या मांडतात. आता बस्स... या रुग्णालयांना जाब विचारण्याची वेळ आली आहे अशी भूमिका मनसेने घेतली आहे.

याविषयी मनसे डोंबिवली शहरअध्यक्ष राहुल कामत म्हणाले, कोरोना महामारीचे संकट जरी गेले असले तरी आजही अनेक रोग दिसून येतात. मधुमेह, हृदयविकाराचे झटके, नेत्रविकार, रक्तदाब व इतर अनेक आजार वाढत आहे. या आजवरील उपचारांचा खर्च अफाट आहे. मनसे विभाग अध्यक्ष रतिकेश गवळी, उपविभाग अध्यक्ष मंगेश तावडे यांच्या माध्यमातून डोंबिवली पूर्वेकडील संगीतावाडी, रघुवीरनगर व दत्तनगर विभागातील नागरिकांकरता आरोग्य शिबीर आयोजित केले होते. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात रुग्णाल दाखल करण्याकरता डिपॉझिटचा जो प्रकार घडला. डिपॉजिट किंवा उपचाराच्या मोठया रकमेचे बिल यावरून डोंबिवलीतील रुग्णाचे नातेवाईक व रुग्णालय व्यवस्थापन यांच्यात वाद होत असतात. मनसेच्या शाखेत अशा अनेक तक्रारी येत असतात. मनसे याची माहिती घेऊन उपचाराकरता शासनाच्या कोणत्या योजना कोणत्या रुग्णालयात आहेत याबाबत जनजागृती करत आहे. सर्वसमान्य डोंबिवलकरांना माफक दरात उपचार मिळावे व रुग्णाची लूट थांबावी व त्यांना योग्य दरात उपचार मिळावे म्हणून मनसे डोंबिवली शहराच्या वतीने आपली भूमिका लवकरच स्पष्ट करील.

## आर्य गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचा सन्मान समारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : आर्य गुरुकुल, वरिष्ठ माध्यमिक विद्यालयाचा प्रतिष्ठित सन्मान सोहळा शनिवारी नांदिवली, कल्याण कॅम्पस येथील बहुउद्देशीय हॉल मध्ये आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम संपूर्ण शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या शैक्षणिक आणि सह-शैक्षणिक उत्कृष्टतेचा एक भव्य उत्सव होता. या समारंभाला प्रमुख पाहुणे, प्रा. डॉ. दिनेश गुप्ता, प्रख्यात प्रेरक वक्ते, जीवन प्रशिक्षक आणि मानसिकता गुरू, यांची उपस्थिती होती. ज्यांच्या उपस्थितीने आणि अंतर्दृष्टीने कार्यक्रमाला खूप मोलाची आणि प्रेरणा मिळाली.

हा समारंभ आर्य गुरुकुलमधील वार्षिक परंपरा आहे, ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि अतिरिक्त अभ्यासक्रम या दोन्ही क्षेत्रांतील सातत्यपूर्ण प्रयत्न, शिस्त आणि यश ओळखणे आहे. शैक्षणिक अव्वल खेळाडूंपासून ते कला, क्रीडा आणि नेतृत्वाच्या भूमिकेतील विजेत्यांपर्यंत, या कार्यक्रमाने संस्थेमध्ये वाढवलेल्या विविध कलागुणांचे प्रदर्शन केले.

यावेळी बोलताना प्राचार्य राधामणी अय्यर यांनी व्यक्त केले.
"आर्य गुरुकुलमध्ये, आमचा असा विश्वास आहे की शिक्षण हे केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित नाही. हा समारंभ आमच्या सर्वांगीण दृष्टिकोनाचा पुरावा आहे जिथे प्रत्येक मुलाच्या क्षमतेचे मूल्यमापन करून उत्सव साजरा केला जातो."
भरत मलिक, आर्यग्लोबल अध्यक्ष पुढे म्हणाले,
"आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांचा कमालीचा अभिमान आहे. त्यांचा चिकाटी आणि उत्कृष्टतेचा प्रवास आम्हा सर्वांना प्रेरणा देतो. हा केवळ एक पुरस्कार सोहळा नाही - तो चारित्र्य, धैर्य आणि वचनबद्धतेचा उत्सव आहे."
अभिमानी पालक, समर्पित शिक्षक आणि उत्साही विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या उत्साही उर्जेमध्ये योगदान दिले आणि हा एक संस्मरणीय प्रसंग बनला. पुरस्कार वितरण आणि प्रमुख पाहुण्यांच्या प्रेरक भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला, ज्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या उद्देशाशी सत्य राहण्यासाठी आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रात उत्कृष्टतेसाठी प्रयत्नशील राहण्यासाठी प्रोत्साहित केले.

## मंगळवारी कल्याण पश्चिमेसह टिटवाळा परिसरात पाणी नाही

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मोहिली जलशुद्धीकरण केंद्र येथील रॉ वॉटर व शुद्ध पाण्याच्या मुख्य जलवाहिनीवर फ्लो मीटर बसविण्याकरिता मंगळवार दि. २२ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ९ तास महापालिकेच्या मोहिली जलशुध्दीकरण केंद्रामधून महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण ग्रामिण विभाग मांडा-टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी व कल्याण ग्रामीण विभागातील इतर गावे व कल्याण पश्चिम "ब" प्रभाग क्षेत्रातील मिलिंद नगर, योगिधाम, चिकनघर, बिर्ला कॉलेज, मुरबाड रोड परिसर येथील परिसरास होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तरी या परिसरातील नागरीकांनी पाण्याचा साठा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन केडीएमसी पाणी पुरवठा विभागाचे कार्यक्रारी अभियंता यांनी केले आहे.

## ग्राहकांना हक्काच्या सेवा पुरवाव्यात अन्यथा आंदोलनाचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



वासिंद : ग्राहकांना हक्काच्या सेवा पुरवाव्यात अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने येथील बँक ऑफ बडोदा या बँक शाखा व्यवस्थापक यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

येथील असलेल्या ऑफ बडोदा या बँक शाखेत वारंवार विविध तक्रारी ग्राहकांकडून येत असून ग्राहकांना त्यांना अभिप्रेत असलेल्या ग्राहकांच्या हक्काच्या अनेक सेवा सुविधांपासून वंचित ठेवत असल्याचे निदर्शनास येत आहेत. त्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी व संताप व्यक्त केला जात आहे. या संदर्भात मनसेचे वासिंद शहर अध्यक्ष अमोल बोराडे, शहर उपाध्यक्ष कुणाल पांडव, अल्पेश खिस्मतराव, वैभव बिडवी या कार्यकर्त्यांनी बँक व्यवस्थापन यांना निवेदन देऊन या याबाबत इशारा दिला आहे.सदर बँकेतील बँकेचे पासबुक प्रिंटिंगचे मशीन अनेक दिवस बंद, एटीएम मशीन देखील वारंवार नादुरुस्त किंवा बंद यामुळे ग्राहकांना या सुविधा उपलब्ध होत नसल्याच्या ग्राहकांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे त्यांना या समस्येला तोंड द्यावे लागत असल्याने ग्राहकांची नाराजी आहे. तसेच कर्मचारी येणाऱ्या ग्राहकाशी अत्यंत उद्धट व उर्मटपणाची वागणूकीत बोलत असल्याने ग्राहकांमध्ये वाद-विवाद निर्माण होत आहेत त्यामुळे ग्राहकांशी सौम्य वर्तन करण्याची समज देण्यात यावी तर शाखेत बँकीय व्यवहार व मराठी भाषेचा परिपूर्ण वापर झाला पाहिजे जेणेकरून ग्राहकांना इतर भाषेचा त्रास होणार नाही अशी सक्त ताकीद देत असल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, याबाबत दखल घेऊन ग्राहकांना त्यांचा अधिकार व सुविधा ताबडतोब उपलब्ध करून द्याव्यात अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन केले जाईल असा इशारा देण्यात आला आहे.

## तहानलेल्या हरीणीची पाण्यासाठी कोरड्या विहिरीत उडी

### मात्र बाहेर पडण्याच्या प्रयत्नात दुर्दैवाने मृत्यू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील डोईफोडी नदीलगत असलेल्या कासगाव हद्दीतील एका कोरड्याठाक विहिरीत तहानलेल्या साडेतीन वर्षांच्या हरीणीने ऊडी मारली परंतु विहीरीत पाण्याचा थेंबही नसल्याने त्या तहानेने व्याकूळ झालेल्या निरागस हरीणीने बाहेर पडण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली,मात्र विहिरीच्या काठावर येऊन पुन्हा पुन्हा खाली पडल्याने एक पाय मोडला तसेच गंभीर जखमा झाल्या या बाबत दक्ष तरुणांनानी मोबाईल द्वारे



सरळगाव येथील वनरक्षक दिगंबर शिंगोळे,वनपाल भांगरे, वनरक्षक लखन रहाटे, भानुदास देसले, अर्जुन फोडले,व अश्वमेध प्रतीष्टान , तसेच वन्यजीव रेस्कुटीमचे साईनाथ भवार,प्रवीण भालेराव यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन अथक परिश्रमाने हरीणीला विहीरी बाहेर काढले परंतु हरीण मोठ्या प्रमाणात जखमी झाल्याने हरीण गतप्राण झाली.या दुर्दैवी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वनविभागाने या मुक्या प्राण्यांसाठी कृत्रिम पाणवठे तयार करून वन्य प्राण्यांची तहान भागवण्यासाठी व्यवस्था केली पाहिजे अशी मागणी वन्य प्राणी प्रेमी कडुन होत आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.






# मुरबाड महावितरणची सहा कोटी ५४ लाखाची विक्रमी वसुली!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड दि.१८ :** मुरबाड तालुक्यात यंदा सर्वत्र कडक उन्हाला जाणवत आहे तरीही मुरबाड महावितरण कंपनीची टीम थकबाकीची वसुली करण्यासाठी पुढे सरसावली असल्याचे चित्र दिसून आले.तर मार्च महिन्यात ५कोटी४६ लाखाची मागणी होती त्या बदल्यात २९ मार्च २०२५ पर्यंत सहा कोटी ५४ लाखाची विक्रमी वसुली करण्यात आली आहे अशी माहिती मुरबाड महावितरण कंपनीचे प्रभारी उप कार्यकारीअभियंता राजेंद्र शिर्के यांनी दिली आहे

मार्च महिना म्हटला की सर्व क्षेत्रातून

| | | |
|---|---|---|
| धसई शाखा<br>५९लाख मागणी<br>७३ लाख वसुली<br>१२३% | मुरबाड शहरी शाखा<br>२.४९. करोड मागणी<br>२.९३ करोड. वसुली<br>११७% | शिरोशी शाखा<br>३५ लाख मागणी<br>४० लाख वसुली<br>११५,% |
| मुरबाड ग्रामीण शाखा<br>१.१७ करोड मागणी<br>१.४५ करोड वसुली<br>१२४% | सारळगाव शाखा<br>८४ लाख मागणी<br>१ करोड वसुली<br>११८% | मुरबाड सब डिव्हिजन<br>५.४६ मागणी<br>६.५४ करोड ५४ लाखाची<br>वसुली ११९% |

मार्च महिन्यात विविध खात्यामार्फत थकबाकीची वसुली करण्यात येत असते त्याच धर्तीवर मुरबाड महावितरण कंपनीची एकूण ग्राहक संख्या घरगुती ३७४०९, वाणिज्य ग्राहक संख्या-२९९२, औद्योगिक ग्राहक संख्या-४८८ असे मिळून एकूण ग्राहक संख्या ४०८८९ आहे अशी असताना कल्याण महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, कार्यकारी अभियंता आंनद ,काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली तर मुरबाड महावितरण कंपनीचे कार्यकारी उप कार्यकारी अभियंता केतन थत्ते यांच्या नेतृत्वाखाली मुरबाड महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता राजेंद्र शिर्के, रवी जाधव, , अमोल विशे,अतुल कानोटे तसेच कनिष्ठ अभियंता अक्षय तोडकर यांच्यासह उपविभागातील सर्व बिलिंग व मानव संशोधन कर्मचारी यांनी उन्हात - तान्हात परवा न करता ६ कोटी ५४लाखाची विविध ग्राहक व घरगुती ग्रहाकांची चालू असलेली थकबाकीची विक्रमी वसुली केल्याने सर्व महावितरण कंपनीच्या टीमचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## मुंबई गोवा महामार्ग पूर्णत्वाची जूनची डेडलाईन हुकणार ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण ( प्रतिनिधी)** मुंबई-गोवा महामार्गाच्या कामात अनेक अडचणी आल्या, परंतु येत्या जून महिन्याअखेर या मार्गाचे काम १०० टक्के पूर्ण होईल, अशी नवीन डेडलाईन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात दिली आहे. परंतु, महामार्गाच्या एकंदरीत कामाच्या परिस्थितीवरून ही डेडलाईन हुकणार असल्याची संतप्त प्रतिक्रिया पेण कोलाड रोहा महामार्गावरील प्रवाशांनी दिली.

यावेळी बोलताना गडकरी म्हणाले की, मुंबई-गोवा महामार्गासाठी अनेक अडचणी आल्या, त्यातून मार्ग काढत हे काम येत्याजूनपर्यंत पूर्ण होईल. हे काम बराच काळ रेंगाळल्याची कबुली देखील गडकरी यांनी दिली. परंतु, त्यावर आता जनतेचा विश्वास राहिलेला नाही. कारण, २०१८ पासून या महामार्गाचे काम पूर्ण होण्याच्या अनेक डेडलाईन लोकनेत्यांकडून देण्यात आल्या आहेत. आता ही दिलेली डेडलाईन फेल जाणार असल्याचे दिसून येत आहे. कारण, कोलाड-आंबेवाडी बाजारपेठेतील उड्डाण पुलाचे काम अपूर्ण स्थितीत असून, गडब येथील काम ते कधी होईल हेदेखील सांगता येत नाही. त्यामुळे गडकरींनी दिलेली डेडलाईन हुकणार असल्याचे प्रवासीवर्गातून सांगण्यात येत आहे.

## पन्नास हजारांची लाच घेताना भूकरमापकास अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण ( प्रतिनिधी)** म्हसळा तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयात कार्यरत असलेला विशाल भिमा रसाळ (वय २९) या प्रतिलिपी लिपिक तथा भूकरमापक (सर्वेअर) या कर्मचाऱ्याला ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने माणगाव एसटी स्टँड येथे रंगेहाथ पकडले.सदर कारवाई १७ एप्रिल २०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगडच्या पथकाने केली. आरोपीने तक्रारदाराकडून मौजे वरवटणे, सर्वे नं. 52/1ब या जमिनीच्या मोजणी, आकारफोड व 'क' प्रत देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितली होती.या प्रकरणी ३४ वर्षीय तक्रारदाराच्या तक्रारीनंतर पडताळणी करण्यात आली, आणि आरोपीने लाचेची मागणी स्पष्टपणे केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लाचलुचपत पथकाने सापळा रचत माणगाव एसटी स्टँडवर लाच घेताना आरोपीला पंच साक्षीदारांसमक्ष रंगेहाथ पकडले.

आरोपीविरुद्ध म्हसळा पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस उप अधीक्षक शशीकांत पाडावे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक भिसे तसेच सहाय्यक फौजदार विनोद जाधव, अरुण करकरे, पोलीस हवालदार महेश पाटील व सागर पाटील यांनी केली.या कारवाईने महसूल विभागात मोठी खळबळ उडाली असून लोकसेवकांकडून होणाऱ्या गैरव्यवहाराविरुद्ध जनतेचा विश्वास वाढविण्यात मदत होणार आहे.

### 'जलजिवन मिशन' योजनेचा हिशोब घेण्यासाठी

## भिवंडी तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतींवर श्रमजीवी संघटनेचा मोर्चा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा दि. १८ (प्रतिनिधी )** भिवंडी तालुक्यातील अनेक गांवामध्ये शासनाने राबविलेली "जल जिवन मिशन" योजना रखडली असुन त्याचा हिशोब घेण्यासाठी एकाच दिवशी भिवंडी तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतीवंर श्रमजीवी संघटनेने मोर्चा नेऊन आंदोलन केले. "जल जिवन मिशन" अंतर्गत "हर घर नलसे जल" ही योजना सन २०२० मध्ये मंजूर करण्यात आली. योजना सुरू होऊन बराच काळ निघुन गेला आहे.तसेच त्यांची आंमलबजावणी आजपर्यंत झालेली नसल्याने अनेक खेडी, पाडी, गावातील कुंदुबांना नळाद्वारे पाणी मिळाले नाही. त्यासाठी श्रमजीवी संघटनेने २०२४ पासुन आंदोलने केली आहेत. एप्रिल, मे, जुन, हे महीने पाणीटंचाई भेडसावणारे असल्याने खेडी, पाडी, गावातील महीलांना,नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.त्यामुळे बुधवारी श्रमजीवी संघटनेने एकाच दिवशी भिवंडी तालुक्यातील ४७ ग्रामपंचायतीवर मोर्चा नेऊन आंदोलन केले या योजनेच्या प्रगतीच्या कामाचा अहवाल, या योजनेवर आतापर्यंत झालेला खर्च व हीशोब संबधीत अभियंता, ग्रामपंचायत देत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरू राहणार असा पवित्रा श्रमजीवी आंदोलनकर्त्यांनी घेतल्याने ग्रामपंचायत प्रशासनात खळबळ उडाली होती. तर या योजनेसंदर्भात लेखी पत्र घेण्यात आले तसेच हीशोब देऊन जाहीर बॅनर लावण्यात यावे अशी मागणी आंदोलन कर्त्यांनी केली. यावेळी सुनील लोणे, जया पारधी, प्रमोद पवार, केशव पारधी, मारुती भांगरे, आशा भोईर, नारायण जोशी, दुष्यंत घायवत, जयेश पाटील, राजु माने, दिनेश भोईर यांची प्रमुख उपस्थिती होती, तर या मोर्चाचे नेतृत्व स्थानिक ग्रामपंचायत प्रमुख, सक्रीय कार्यकर्ते यांनी केले.



## वाहुली येथील पाच गोदामे जळून खाक

### वर्षभरातील दुसरी घटना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा दि. १८ (प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील वाहुली गावाच्या हद्दीत व मुंबई नाशीक महामार्गालगत असलेली पत्र्याची ५ गोदामे आगीत जळुन खाक झाली आहेत. याच ठिकाणी आगीची वर्षभरातील दुसरी घटना असल्याने परीसरात घबराट पसरली आहे.

भगत ताराचंद हॉटेल जवळ मशीनरी पॅकिंग करण्यासाठी प्लास्टीक, लाकडी पायलेट बनवण्याचे व पुठ्ठा, भंगार सामानाची पत्र्याची गोदामे असुन गुरुवारी पहाटे या गोदामांना अचानक आग लागल्याचे लक्षात आले.

बघता बघता प्लास्टिक, लाकडी, भंगार सामानामुळे आगीने रूद्र रुप धारण केले स्थानिक नागरिकांच्या मदतीने गोदामातील कामगारांना बाहेर काढल्याने अनर्थ टळला मात्र एका गोदामात मालवाहू टेम्पो असल्याने तो आगीच्या भक्ष्यस्थानी पडुन जळुन खाक झाला आहे यावेळी आग आटोक्यात आणण्यासाठी भिवंडी महानगरपालिका अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले होते.अग्निशमन दलाच्या जवानांनी आग अल्पावधीतच आटोक्यात आणली असली तरी भंगार सामानामुळे आग दोन दीवस धुमसत होती. मागील वर्षी एप्रिल महिन्यात यांच गोदामांना आग लागुन पत्र्याची १४ गोदामे जळुन खाक झाली होती. तर यावेळी अग्निशमन दलाला पाचारण, पाण्याचे टँकर उपलब्ध करून देण्यासाठी, टोरेंट पॉवर, पोलीस प्रशासन, तहसीलदार, तलाठी, ग्रामपंचायत कुंरूद यांना कळविण्यासाठी व आग लवकर आटोक्यात येण्यासाठी वाहुली गाव विकास प्रतिष्ठान अध्यक्ष सुरेश शिंदे, शंभुदुर्ग संघटनेचे तालुका सचीव गणेश मते, पोलीस पाटील दीलीप धनगर, ग्रामस्थ प्रभाकर जाधव, शांताराम पाटील, गुरूनाथ मते, कैलास जाधव, नवनाथ सोनावळे, संदीप जाधव सह सर्व ग्रामस्थांनी मेहनत घेतली.



## भंगार व जीर्ण बसगाड्यांतून मुरबाडकरांचा जिवघेणा प्रवास कधी थांबणार ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड-प्रतिनिधी**

मुरबाड व शहापूर हे दोन्ही तालुक्याच्या भौगोलिक सिमा एकमेकांना लागून असून दोन्ही तालुके विस्ताराने मोठे आहेत .तालुक्याच्या ग्रामिण भागाचा विचार केल्यास मुरबाड पासून सह्याद्रीच्या पर्वत रांगेत वसलेल्या मेर्दी, मोधळवाडी,धारखिंड, वाल्हिवरे, सावर्णे, पळू, रामपूर ही गावे मुरबाड पासून सुमारे 40 ते 50 कि.मी.अंतरावर आहेत. या ठिकाणाहून तसेच तालुक्याच्या इतर खेडो पाड्यातून शेकडो नागरिक, शाळेय विद्यार्थी, महिला, कामगार,जेष्ठ नागरिक मुरबाड येथे रोज प्रवास करत असतात. यांना येण्या-जाण्यासाठी एकमेव प्रवासाचा आधार म्हणजे एसटी बस . परंतु सध्या याच एस.टी.महामंडळाच्या बसेसची अवस्था अत्यंत वाईट झाली असून वाहतुक सेवा पूर्ण कोलमडून पडली आहे. सध्या मुरबाड आगारकडे अत्यंत तुटपुंज्या बसेस असून आहेत त्यांची अवस्था बिकट झाली आहे.कोणती गाडी कुठे ब्रेक डाऊन होईल व कुठे अपघात होईल हे सांगता येत नाही. गेल्या दोन महिन्यात मुरबाड करांना अनेक वेळा छोट्या मोठ्या अपघाताला सामोरे जावे लागले आहे.यामध्ये मुरबाड खांडपे बस अपघात, मुरबाड शहापूर रोडवरील कुडवली येथे पलटी होऊन पेट घेतलेली बस तर दोन दिवसापुर्वी नढई येथे रात्री मोटारसायकल स्वाराला धडक देऊन झालेला अपघात असो.असे रोज छोटे मोठे अपघात घडत आहेत. परंतु एसटी महामंडळ मात्र हताश होऊन हे सारे पाहत आहे. मुरबाडकरांचे नशीब बलवत्तर म्हणून कोणतिही जिवित हानी झाली नाही. सध्या तरी अत्यंत जीर्ण व भंगार झालेल्या बस मधून मुरबाड करांना जिव मुठित घेऊन प्रवास करावा लागत असुन एस.टि.महामंडळ एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहे का असा संतप्त सवाल मुरबाडकर करत आहेत.




*** मुरबाड व शहापूरसाठी गाड्यांची संख्या सध्या खूपच कमी आहे .ज्या उपलब्ध आहेत त्यांचेही अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अपघात झाल्या नंतर दुरूस्ती साठी कळवा येथे न्यावे लागत असून वेळ जात असतो. मुरबाड व शहापूरसाठी नविन दहा -दहा गाड्यांची मागणी शासनाकडे केली आहे परंतु अजूनही त्या उपलब्ध झाल्या नाहीत.त्यासाठी वरिष्ठ पातळीवर आमचे प्रयत्न सुरु आहेत.**

■ सागर पळसुळे
विभागिय नियंत्रक ठाणे.

## भिवंडीतील कोंडीवर तोडगा काढण्यासाठी कृती समितीची आढावा बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी शहरातील वाहतुक कोंडीवर उपाययोजना करण्याकरिता दिनांक 06.03.2025 रोजीच्या बैठकीमध्ये पोलीस विभाग आणि महानगरपालिका अधिकारी यांची कृती समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीची मा. प्रशासक तथा आयुक्त महोदयांच्या अध्यक्षतेखाली आज दिनांक 16.04.2025 रोजी आढावा बैठक पार पडली. या बैठकीमध्ये प्रामुख्याने शहरातील अनधिकृत, विनापरवाना रिक्षांवर परिवहन विभागामार्फत कारवाई करण्याचे निर्देश आयुक्तांनी सबंधितांना दिले.

शहरातील मुदत बाह्य वाहने, विनापरवाना वाहने, फिटनेस प्रमाणपत्र नसलेली वाहनांची विशेष शोधमोहीम पुढील 2 महिने सुरू ठेवण्याबाबत पोलीस विभागाने विनंती केली, जेणेकरुन शहरातील वाहतुकीचा भार कमी होऊ शकेल. शहरातील अनधिकृत रिक्षा स्टँडवरदेखील कारवाईचे निर्देश आयुक्तांनी दिले.

याकरिता परिवहन विभाग, पोलीस विभाग आणि महानगरपालिका यांनी एकत्रितपणे कारवाई करावी. तसेच, शहरातील रस्त्यांवरील, उड्डाणपुलाखालील बेवारस वाहने ज्या वाहन मालकांची आहेत त्यांनी तात्काळ उचलावीत अन्यथा त्यांच्यावर बेवारस वाहन म्हणून स्टिकर चिकटवण्यात येऊन, मुदतीनंतर जप्तीची कारवाई परिवहन विभागामार्फत करण्यात येईल. तसेच या बेवारस वाहनांची तातडीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी परिवहन विभागाची राहील असे आयुक्तांनी नमुद केले. महानगरपालिकेने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बांधलेला वाहनतळ विनावापर पडुन आहे, तो नागरीकांना वाहने पार्कींगसाठी मोफत उपलबध करुन देण्याबाबत मालमत्ता विभागाने तपासुन तातडीने अहवाल सादर करण्याच्या सुचना आयुक्तांनी मालमत्ता विभाग प्रमुखांना दिल्या.

या बैठकीस मा. अतिरीक्त आयुक्त श्री. देविदास पवार, श्री. विठ्ठल डाके, उपायुक्त (अतिक्रमण) विक्रम दराडे, सहायक पोलीस आयुक्त (पुर्व) श्री. देशमुख, सहायक पोलीस आयुक्त (पश्चिम) श्री. शरद ओहोळ, शहर अभियंता श्री जमील पटेल, पोलीस निरीक्षक (वाहतूक) श्री. सुधाकर खोत, श्री. रवी साठे, परिवहन अधिकारी (RTO), प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र. 1-5, आणि पाणीपुरवठा, बांधकाम, विद्युत या विभागाचे अभियंते, संबंधित विभागप्रमुख उपस्थित होते.

## तहानलेल्या खारेपाटाला हेटवणे धरणातील पाण्याची आशा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण(प्रतिनिधी)** खारेपाट विकास संकल्प संघटना यांच्या माध्यमातून वाशी येथे दोन वेळा आमरण उपोषण झाले यातून एकदा श्रद्धांजली वाहून मेणबत्तीचे प्रकाश सरकार पर्यंत पोहचले.उपोषण थांबले मात्र फलित लवकर मिळत नाही हे पाहून दुसरे आमरण उपोषण करावे लागले. अगदी लोकसभा लागणार त्या अगोदर, खारेपाट ग्रुपची तरुणाई हुशार,त्यांनी चक्क गाढवाचे लग्न लावले.आणि पुन्हा एकदा सरकारला या गंभीर आणि लोकपयोगी प्रश्नाचा विचार करावा लागला.यावेळी मात्र विद्यमान खासदार सुनिल तटकरे वाशी येथे येऊन तरुणाईची चिकाटी,पाहून मुख्यमंत्री फडणवीस साहेब यांच्या बरोबर उपोषण कर्ते यांच्याशी फोन वरून चर्चा घडवून आणली आणि वचन मिळवून दिले सिंचनाची सोय होऊन लाडक्या बहिणीच्या डोक्यावरून हंडा उतरविला जाईल असे वचन दिले.काम होईल उपोषण मागे घ्या..कारण सर्वांची काळजी वाटत होती.त्यांचा मान ठेऊन एका उपोषण कर्त्याने उपोषण सोडले मात्र एक टीम मुंबई येथे विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांच्या बरोबर बैठक करत होते..एकदम भारी दिवस त्यात यश मिळाले...हा मोठा संदेश घेऊन आमची टीम मुंबई वरून परतली आणि एकदाचे उपोषण थांबले.यश नक्की मिळेल कारण लोकसभेची आचार संहिता लागण्या अगोदर ७६६ कोटी रुपयांची मंजुरीचे पत्र तटकरे साहेबांनी मिडिया समोर वाचून दाखविले.एव्हढेच नव्हे तर ते पत्र उपोषण कर्त्यांच्या हातात सुपूर्त केले..याला म्हणतात दिलेला शब्द खरा करणे.मात्र साहेब खासदार झाले विभागातून भरघोस मते मिळाली.नंतर विधान सभा झाली नवीन सरकार आले. वर्ष झाले तरीही कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली,निविदा उघडण्यात आली असून सुद्धा कार्यारंभ आदेश कधी सुरू होईल याची चातक पक्षी जसा वाट पहातोय तशी वाट पाण्याची पाहत आहे येथील जनता ,लाडक्या ब हिण ी. व ेळ ोव ेळ ी अधिकाऱ्यांबरोबर संपर्क करणारे कार्यकर्ते आहेत.नेते लोकप्रतिनिधी पाहिजे तसा सहकार्य करत आहे असे चित्र दिसत नाही.आत्ता या दोन महिन्यात शक्यता कमी कारण पाऊस, वाहतूक समस्या, नेहमीचाच अनुभव.वास्तविक प्रशासनाने मनावर घेऊन ही तडफड थांबवावी.मायबाप सरकार याकडे लक्ष देतील यासाठी ११ एप्रिल २०२५रोजी खासदार तटकरे साहेब यांच्या बरोबर चर्चा करून काय अडथळा आहे.हे जाणून घेतले साहेबांनी माझे काम.मी हे सर्व केलेले असताना विलंब नको तातडीने त्रुटी पूर्ण करा आणि कार्यारंभाचा आदेश द्या असे वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगण्यात आले.शेवटी जो जे काम करतो त्याला ते पूर्णत्वास गेल्यावर खरे समाधान लाभते.साहेबांनी मनावर घेतले आहे ते पूर्ण व्हावे. आणि जगदंबा माते चरणी शुभारंभाचा नारळ फोडावे.ज्यांनी १५ दिवस अन्न त्याग करून स्वतःला त्रास दिला त्याचे समाधान ,त्यांची स्वप्न पूर्ती, समस्थ नागरिक ,संघटना,सर्वस्वी मदत करणारे लोकप्रतिनिधी यांना सुद्धा हायसे वाटेल. एकदाचे तहानलेल्या वाशी खारेपाटाला ईडा पिडा जावो आणि हेटवणे धरणातील सिंचनाचे पाणी लवकरात लवकर मिळावे अशी मागणी जनतेनी केली आहे.



## कल्याणात पाककला स्पर्धा आणि महिलांची फसवणूकीवर व्याख्यान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण-** आपलं प्रतिष्ठान ह्या संघटनेच्या विद्यमाने सोमवार २८ एप्रिल रोजी स्वतंत्र महिलांसाठी तसेच महिला मंडळ आणि महिला बचत गटांसाठी निःशुल्क पाककला स्पर्धा , ब्यूटी पार्लर कडून होणारी फसवणूक ह्या विषयावर व्याख्यान आणि महिलांना नोकरी मिळवून देण्यासाठी नोंदणी अभियान असे कार्यक्रम राबवण्यात येणार असून महिलांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष अनिल काकडे यांनी केले आहे . कल्याण पश्चिम येथील महापालिकेसमोरील स्वामी नारायण हॉल येथे सकाळी ९ ते ४ या वेळेत सदर कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. ह्या कार्यक्रमाचे उद्घाटन पालिकेच्या उपायुक्त स्वाती देशपांडे यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर , मुलाखत घेण्याबाबत विश्व विक्रम रचलेल्या रचना बागवे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात सुप्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट पौर्णिमा शेकोकार यांचे ब्यूटीपार्लर कडून महिलांची फसवणूक ह्या विषयावर दुपारी ३ वाजता व्याख्यान आयोजित करण्यात आले असून महिलांना नोकरी देण्यासाठी नोंदणी अभियान राबविण्यात येणार आहे. पाककला स्पर्धसाठी पूर्व नोंदणी असणे आवश्यक असून नियमांच्या अधिक माहिती साठी अनिल काकडे ९३२४५५२९६३/८१०४२११८१८ ह्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे

## भक्ती हरड यांना कराटे स्पर्धेत सुवर्ण पदक !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वासिंद ( प्रतिनिधी ) -** येथील जी.पी.पाटील ज्युनिअर विद्यालय खानिवली या शाळेची विद्यार्थिनी भक्ती रविकांत हरड इयत्ता अकरावी हिने सतरा वर्षे वयोगटात कराटे स्पर्धेत राज्य स्तरावर सुवर्ण पदक पटकावले आहे. मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमी ठाणे आयोजित राज्य स्तरीय कराटे स्पर्धा भाटिया हॉल ठाणे कोपरी येथे पार पडली. या झालेल्या स्पर्धेत त्या जी.पी.पाटील ज्युनिअर कॉलेज खानिवली या विद्यालयाची विद्यार्थिनी भक्ती हरड हिने राज्य स्तरीय सुवर्ण पदक प्राप्त केले आहे. भक्ती या विद्यार्थ्यांनीने राज्य स्तरावर सुवर्ण पदक मिळवून विद्यालयाचे नाव लौकिक केले आहे. त्यामुळे भक्ती तसेच क्रीडा शिक्षक (कराटे प्रशिक्षक) दौलत चव्हाण यांचे विद्यालय प्राचार्य प्रवीण पितांबरे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com



# कल्याण न्यायालयाच्या प्रांगणात वकिलांचे रक्तदान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त रक्तदात्यांच्या सेवाभावी वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि गरजू रुग्णांना आवश्यक तेवढा रक्तसाठा उपलब्ध व्हावा यासाठी कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटना आणि गायकवाड फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी कल्याण जिल्हा न्यायालय प्रांगण, कल्याण येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये सहभागी होऊन कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील वकील बांधवांनी आपले सामाजिक कर्तव्य पार पाडले. रक्तदान शिबिराचा प्रारंभ कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील जिल्हा न्यायाधीश इनामदार, अस्तुरकर, हरणे, मुळे आणि मोटे यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून रक्तदानाला प्रारंभ करण्यात आला. यावेळी कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष अँड. प्रकाश जगताप, उपाध्यक्ष अँड. गणेश पाटील, सचिव अँड. चंद्रकांत वाघमारे, सहसचिव अँड. सुशील धनगर, सदस्य अँड. प्रदीप बावसकर, अँड. मनिषा घिवरे आणि गायकवाड फाउंडेशनचे अध्यक्ष अँड.रोहन गायकवाड, अँड. विशाल केदार यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. या शिबिरात 37 युनिट रक्तदान करण्यात आले तसेच 200 पेक्षा जास्त नागरिकांचे डोळे तपासणी करण्यात आली आणि जवळपास दीडशेपेक्षा जास्त लोकांचे फुल बॉडी चेकअप मोफत करण्यात आले.

## संक्षिप्त

### खर्डीच्या जीवनदीप महाविद्यालय विद्यार्थ्यांचे नेत्रदिपक यश





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
खर्डी : जीवनदीप महाविद्यालय खर्डी च्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय लॅक्रोस स्पर्धेत पुणे येथे उल्लेखनीय कामगिरी दिनांक 14 व 15 एप्रिल 2025 रोजी झालेल्या राज्यस्तरीय लॅक्रोज या नव्या क्रीडा प्रकारात जीवनदीप महाविद्यालयातील वरिष्ठ विद्यार्थ्यांनी ठाणे जिल्हा खुला गटात चतुर्थ क्रमांक पटकावला तसेच तसेच 19 वयोगटाखालील विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकावल. काही विद्यार्थी हे पुढील राज्य पातळीवर खेळण्यासाठी देखील निवड झाली. सदर खेळात 19 वयोगटा खालील गटात जीवनदीप महाविद्यालयाचे विद्यार्थी सनी गावित, आयुष्य खंडे, प्रसाद जाधव याची महाराष्ट्र संघासाठी साठी निवड झाली आहे. या खेळाडूंनी उत्तम कामगिरी केली असून श्री रविंद्र घोडविंदे ( अध्यक्ष, जीवनदीप शैक्षणिक संस्था) प्रा कैलास कळकटे ( प्र.प्राचार्य) प्रा सोनाली शेलार ( क्रिडा प्रशिक्षक) सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे

### शेतकऱ्यांनी विमा ई-पीक पाहणी करुन घ्यावी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : रायगड जिल्ह्यामध्ये आंबिया बहार सन-2024-25 करिता युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी मार्फत आंबा व काजू फळपिकांसाठी फळपीक विमा योजना योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी विमा संरक्षित क्षेत्राची ई-पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

12 जून, 2024 च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येत आहे. पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेच्या निकषानुसार या विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना ई-पीक पाहणे करणे बंधनकारक आहे. ज्या शेतकऱ्यांनी आंबिया बहार सन 2024-25 मध्ये फळपीक विमा योजनेत सहभाग घेतलेला आहे. परंतु फळपिकांची ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल अ‍ॅपद्वारे केलेली नाही त्यांनी दि.25 एप्रिल 2025 पर्यंत विमा संरक्षित क्षेत्राची ई-पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावी. अन्यथा योजनेच्या निकषानुसार ई-पीक पाहणी नोंद नसलेले सर्व विमा अर्ज रद्द करण्यात येतील व फळपीक विम्याचा लाभा दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

### ‘एका रात्र निळ्या पाखराची’ विचारांची जागर यात्रा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : भारताच्या संविधानाचे शिल्पकार, दलित, शोषित, वंचित समाजाच्या मुक्तीचा ध्यास घेतलेल्या महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त स्नेह वर्धक नगर मित्र मंडळ यांच्यावतीने गुरुवारी कल्याण पूर्व येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात "एका रात्र निळया पाखराची" या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन पत्रकार अशोक कांबळे यांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार, त्यांची दूरदृष्टी, आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न गेली २५ वर्षे मंडळ सातत्याने करत आहे. हा उपक्रम केवळ सांस्कृतिक नव्हे तर सामाजिक जागृतीचा दीपप्रज्वलन आहे.

या प्रेरणादायी संध्याकाळी कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड, शिवसेना शहर प्रमुख निलेश शिंदे, माजी परिवहन सभापती नवीन गवळी, मनोज चौधरी, माजी नगरसेवक भीमराव डोळस, सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, कोळशेवाडी पोलीस ठाण्याचे व.पो.नि. गणेश न्यायदे, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती (समता फेरी) अध्यक्ष सुमेध हुमणे, माजी अध्यक्ष केतन रोकडे, हरिभाऊ भालेराव, भारत सोनावणे, धर्मा वक्ते तसेच सर्व आजी-माजी पदाधिकारी आणि प्रचंड संख्येने भीम अनुयायी बांधव उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून चार लाख ७५ हजारांची फसवणूक

## आंबिवलीतील खासगी रुग्णालयाचा पर्दाफाश

### बनावट कागदपत्रांवर १३ रुग्ण दाखवून निधी उकळला

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : मुख्यमंत्री सहाय्यता निधीसारख्या गरजूंना मदतीचा हात देणाऱ्या शासकीय योजनेचा गैरवापर करत, आंबिवलीतील एका खासगी रुग्णालयाने तब्बल चार लाख पंच्याहत्तर हजार रुपयांचा निधी बनावट कागदपत्रांच्या आधारे उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी गणपती मल्टिस्पेशालिस्ट रुग्णालय आणि त्यातील तीन डॉक्टरांविरोधात खडकपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आर्थिक गुन्हे शाखेने या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभागाचे प्र. सहाय्यक संचालक देवानंद धनावडे यांनी १७ एप्रिल २०२५ रोजी खडकपाडा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या निधीचा गैरवापर होत असल्याची शंका निर्माण झाल्यानंतर, आर्थिक गुन्हे शाखेने सखोल तपास सुरू केला होता. तपासात धक्कादायक बाब उघडकीस आली की, डॉ. आनंदुर्ग ढोनी, डॉ. प्रदीप पाटील आणि ईश्वर पवार (रा. धुळे) या डॉक्टरांनी आपसात संगनमत करून, २६ मे २०२३ ते १० जुलै २०२३ या कालावधीत एकूण १३ गरीब रुग्ण दाखल नसतानाही, त्यांच्यावर उपचार आणि शस्त्रक्रिया झाल्याचे दाखवून बनावट कागदपत्र तयार केली. या कागदपत्रांच्या आधारे राज्य शासनाकडून मिळणाऱ्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीअंतर्गत तब्बल ₹4 लाख 75 हजारांचा निधी उकळण्यात आला.

या बनावट प्रकरणाची माहिती मिळताच मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभागाने याची चौकशी सुरू केली, आणि चौकशी अहवाल आर्थिक गुन्हे शाखेकडे सुपूर्द करण्यात आला. आर्थिक गुन्हे शाखेने संपूर्ण प्रकरणाची खातरजमा करून, सदर रुग्णालयाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. या गंभीर प्रकरणाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुरेश घुगे हे करत असून, अधिक दोषाऱ्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.




# बल्याणी ते टिटवाळा रस्त्यावरील फुटपाथाने घेतला मोकळा श्वास



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाच्या "अ" प्रभाग क्षेत्रातील बल्याणी ते टिटवाळा रस्त्याच्या फुटपाथवर अनधिकृत, टपऱ्या अनधिकृत हातगाड्या,अनाधिकृत ठेले वाले यांनी बेकायदेशीर पणे अतिक्रमण केल्याने रस्त्याचे पदपाथ अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले होते. यावर प्रशासनाने शुक्रवारी धडक कारवाई चा बडगा उगारत पदपथ मोकळे केले.

कल्याण डोंबिवली मनपा आयुक्त अभिनव गोयल यांच्या सूचनेनुसार रस्त्याचे पदपथावरील अतिक्रमणे हटवून पदपथ मोकळे करा यानुसार, अ प्रभाग क्षेत्राचे सहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी पदपथावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी शुक्रवारी धडक कारवाई मोहीम सुरू केली. बल्याणी ते टिटवाळा मंदिर रस्त्याच्या फुटपाथवर बस्तान मांडित अनधिकृत टपऱ्या , अनधिकृत हातगाड्या, अनाधिकृत ठेलेवाले यांच्यावर कारवाई चा बडगा उगरित 136हून अधिक अनाधिकृत फुटपाथवरील अतिक्रमणावर तोडक कारवाई केल्याने बल्याणी ते टिटवाळा रस्त्याच्या फुटपाथने मोकाळा श्वास घेतल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत होते.

# शाळांना मिळणाऱ्या आरटीई प्रतीपूर्तीसाठी चर्चासत्र



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : ओमकार इंटरनॅशनल स्कूल, डोंबिवली येथे शाळानां आरटीई प्रती पूर्ती मिळण्यासाठी होणारी दिरंगाई आणि शांळांचे आरटीई प्रती पूर्ती प्रस्ताव शिक्षण विभागाकडून नाकारणे यावर चर्चा सत्र आयोजित केले होते. या चर्चा सत्रात आरटीई प्रवेशा वेळी शाळा पात्र परंतु आरटीई प्रती पूर्ती वेळा अपात्र या विषयावर चर्चा सत्र पार पडले.

आरटीई प्रवेशा वेळीच शाळेची पात्रता तपासण्यात यावी आणि मगच प्रवेश द्यावेत. आरटीई प्रवेश दिल्यानंतर वेळेवर एप्रिल महिन्यात पहीला आणि सप्टेंबर महिन्यात लगेच दुसरा प्रती पूर्ती हप्ता शाळांना मिळावा, तसेच गेल्या ७ वर्षा पासुन प्रलंबित प्रती पूर्ती रक्कम तात्काळ वितरित करावी अशी मागणी २० पेक्षा जास्त आरटीई प्रवेश पात्र शाळांनी केली व त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे सर्वानुमते ठरले. हे चर्चा सत्र यशस्वी होण्यासाठी आरटीई फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. सचिन काळबांडे, ओमकार इंटरनॅशनल स्कूल च्या संचालिका दर्शना सामंत, अनुजा नाईक, प्रायव्हेट अनअडेड स्कूल मॅनेजमेंट असोसिएशनचे सह सचिव अँड. अशोक साळवे, पुष्माचे भरत मलिक, साकेत तिवारी, डॉ. वृंदा भुसकुटे आणि विशाखा सुतार यांनी प्रयत्न केले.

# विक्रम चालकांचा रोजगार हिरावून घेऊ नका - विष्णूभाई पाटील



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : पेण नगरपालिकेचा डोळा आता विक्रम मिनिडोअर यांच्या जागेवर लागला असून पेण न.पा. ने सदरची जागा खाली करण्याची नोटीस विक्रम चालकांना देण्यात आल्या-नंतर सावरसई येथे विक्रम चालक-मालक सभा पार पाडली . स्थानिक शेकडो विक्रम मिनिडोअर चालकांचा रोजगार हिरावून घेत असाल तर यापुढे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा विष्णुभाई पाटील यांनी दिला.यापुढे एक इंचही जागा पेण नपाला न देण्याचा निर्धार करण्यात आला. गेली २५ वर्षापासून आमचा रोजगार पेण नपा हिरावून घेउ पाहात आहे. मात्र तो कदापी होऊ देणार नसल्याची भूमिका घेण्यात आली त्यासाठी मोठे आंदोलन करण्याची तयारी ठेवली आहे यासाठी , मी सदैव तुमच्या पाठीशी राहाणार आहे, ज्यांना आपण निवडून दिले तेच तुम्हाला बेघर करण्याचा प्रयत्न करत असतील तर आपण पेटून उठले पाहिजे. आज ४०० विक्रम चालकांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येत असेल तर सर्व कुटुंबासहीत रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा निर्धार करण्यातआला.सदरची जागा घोडागाडी स्टॅन्ड म्हणून आरक्षित असून तालुक्यातील शेकडो विक्रम चालकांना रोजगार म्हणून गेली २५ वर्षांपासून उपलब्ध करत असताना पेण न.पा. आम्हाला उद्ध्वस्त करणार असेल तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना उबाठा गटाचे नेते विष्णूभाई पाटील यांनी पेण नपाला दिला आला. तसेच सदरच्या भाजी मंडईला नानासाहेब धर्माधिकारी यांचे नाव देण्यात आले आहे, मात्र या इमारतीत जुगाराचे अड्डे चालू असून हे कोणाच्या आशिवादाने चालू आहेत असा सवाल उपस्थित करून हे अशोभनिय असल्याचे पाटील यांनी बोलून दाखवले.

# पलावा काटई उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला होणार

## - आमदार राजेश मोरे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण शिळ मार्गावरील बहुप्रतीक्षेत पलावा काटई उड्डाणपुल ३१ मे २०२५ पासून वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे. आज कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी या पुलाची पाहणी केली. यावेळी रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना पुलाच्या कामाचा वेग वाढविण्याच्या सूचना आमदार मोरे यांनी दिल्या यावेळी अधिकार्यांनी हि माहिती दिली. कल्याण शिळ मार्गावरील पलावा एक्स्पेरीया येथील वाहतुकीचा खोळंबा टाळण्यासाठी कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नातून या उड्डाणपुलाचे काम सुरु आहे.

पलावा काटई उड्डाणपूल हा कल्याण शिळ मार्गावरील अतिशय महत्वाचा उड्डाणपूल असून या पुलामुळे या मार्गावरील वाहतूक कोंडी फोडण्यास मदत होणार आहे. यामुळेच या पुलाच्या कामाचा वेग वाढविण्याचे निर्देश आज आमदार राजेश मोरे यांनी रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्याबरोबर पाहणी करताना दिले. यावेळी रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता बारवकर, कार्यकारी अभियंता निर्तीन बारोळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, कल्याण ग्रामीणचे विधानसभा संघटक बंडू पाटील, जेष्ठ पदाधिकारी दत्ता वझे, कल्याण ग्रामीण संघटक अर्जुन पाटील यांच्यासह इतर अधिकारी आणि शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

कल्याण शिळ मार्गावरील कोंडी फोडण्यासह वाहतूक सुलभ करण्यासाठी या मार्गाचे रुंदीकरण आणि आवश्यक तिथे उड्डाणपूल उभारण्याचे काम खासदार डॉ शिंदे यांच्या प्रयत्नातून सुरु असून यातील अडथळे दूर करत काम पूर्ण करण्यासाठी खासदार शिंदे यांच्या समवेत आमदार राजेश मोरे प्रयत्न करत आहेत. दिवा पनवेल रेल्वे मार्गावरून जाणार्या या पुलामुळे नागरिकाना सुकर प्रवास करणे शक्य होणार आहे. मागील अनेक दिवसापासून हे काम सुरु असून या पुलाच्या कामाची पाहणी करण्यासाठी आमदार राजेश मोरे यांनी पाहणी दौरा केला. यावेळी अधिकाऱ्यांनी पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून ३१ मे २०२५ पासून हा पूल वाहतुकीसाठी खुला करणे शक्य असल्याचे आश्वासन दिल्याचे आमदार मोरे यांनी सांगितले.

# जि.प. शिक्षकांची ऑनलाइन बदली कार्यप्रणाली सुरु होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / शहापुर : जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हाअंतर्गत व आंतरजिल्हा ऑनलाईन बदली कार्यप्रणाली एप्रिल अखेर सुरू होणार आहे. शासनाने 18जून 2024 रोजी प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयात 2019 पासून अवघड क्षेत्रात कार्यरत शिक्षकांना 2025 च्या बदलीत एक संधी देण्यात येणार होती. परंतु त्यानुसार सर्वच जिल्हा परिषदेत अंमलबजावणी बाबत संभ्रम निर्माण झाला होता.त्यामुळे म.रा. शि. परिषदेने आमदार संजय केळकर यांच्या कडे सातत्याने मागणी केल्याने या विषयावर मार्गदर्शन मागविण्यात आले.यावर चर्चा करण्यासाठी मंत्रालयीन स्तरावर राज्यस्तरीय संघटना सोबतच्या बैठकीत राज्य कार्याध्यक्ष भरत मडके यांनी शिक्षकांच्या बदली संदर्भात येणाऱ्या अडचणीबाबत ठोस भूमिका मांडली होती तरीही 28 मार्च2025 च्या शुद्धीपत्रकात फक्त विनंती अर्ज केलेल्या शिक्षकांनाच संधी देण्यात आली परंतु उर्वरित हजारो शिक्षकांवर यामुळे अन्याय झाला होता.याबाबत आमदार संजय केळकर व भरत मडके यांच्या सहकाऱ्यांनी सातत्याने मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करून ग्रामविकास मंत्री जयकुमारजी गोरे यांनाशिक्षक बदल्यांचा मुद्दा पटवून दिला व 16 एप्रिलच्या शुद्धीपत्रकात सदर अट रद्द करण्यात आली.राज्यातील हजारो शिक्षकांना संजय केळकर यांच्या पाठपुराव्याने व म.रा. शि.परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष भरत मडके सर,जिल्हा चिटणीस रविंद्र पालवे,कोकण विभागीय महिलाध्यक्ष जयश्री वारंगुळे, जिल्हासंघटक सुधीर भोईर व इतर पदाधिकाऱ्यांच्या प्रयत्नाने न्याय मिळाल्याने शिक्षक समाधान व्यक्त करीत आहेत.

# राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस पदी मुरबाडचे प्रा. लियाकत शेख



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यात गोरगरीब अन्याय / अत्याचाराच्या विरोधात काम करणारे तसेच सामाजिक, शैक्षणिक, क्षेत्रात महाराष्ट्रात काम करणारे प्रा. लियाकत शेख यांची राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी निवड झाली आहे. या निवडीमुळे प्रा. लियाकत शेख यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी गुरुवारी १७ एप्रिल २०२६ रोजी प्रदेश कार्यालयात प्रा लियाकत यास नियुक्तीचे पत्र दिले.

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे विधानसभेचे गटनेते आमदार जितेंद्र आव्हाड, भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश (बाळया मामा) म्हात्रे, ठाणे जिल्हा अध्यक्षा विद्या वेखंडे ,पक्षाचे मुरबाड विधानसभाचे नेते सुभाष पवार यांनी प्रा.लियाकत शेख यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या

# ट्रक आणि दुचाकीच्या भीषण अपघातात बाप लेक गंभीर जखमी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी परिसरातील रस्त्यावर शुक्रवारी सकाळी ट्रक खाली दुचाकी आल्याने झालेल्या अपघातात बाप लेक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. ट्रकखाली मोटरसायकल असल्याने अपघात बाप लेकीचे या अपघातात पाय गेले. या अपघातात मनोहर तांबे आणि त्यांचीमुलगी प्रज्ञा तांबे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर कल्याणच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मनोहर तांबे भिवंडीत नोकरीला असून त्यांची मुलगी प्रज्ञा तांबे ही खाजगी नोकरी करीत आहे. हे बाप लेक भिवंडी वरून कल्याणला येत असताना कल्याण दुर्गाडी चौकात ट्रक खाली मोटर सायकल येऊन अपघात झाला.




‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अँड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024